# ठाणे पोलिस आयुक्तांना पाचारण

## रोशनी शिंदे मारहाण अहवाल



म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

### न्यायालयाकडून जामीन

फेसबुकवर आक्षेपार्ह विधानाप्रकरणी भाजप आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीनंतर रोशनी यांच्यावर नौपाडा आणि कासारवडवली पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. कासारवडवली गुन्ह्यात त्यांना न्यायालयाकडून अंतरिम जामीन मिळाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या रोशनी शिंदे यांना मारहाणप्रकरणी पोलिस निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालाबाबत महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी असमाधान व्यक्त केले. ठाणे पोलिस आयुक्तांना याप्रकरणी आयोगाच्या कार्यालयात मंगळवारी हजर राहून अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. ठाणे पोलिस आयुक्त काय अहवाल सादर करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

ठाणे येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या रोशनी शिंदे यांना शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचे प्रकरण समोर आले. याप्रकरणी आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच महिला आयोगाने गंभीर दखल घेतली. आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना अहवाल सादर करण्याची सूचना केली होती. कासारवडवली पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकांनी अहवाल सादर केला. यामध्ये दोन अनोळखी महिलांविरोधात अदखलपात्र गुन्हा नोंद करून न्यायालयाच्या परवानगीने पुढील तपास सुरू आहे, असे नमूद केले आहे. अहवालाबाबत चाकणकर यांनी असमाधान व्यक्त केले. रोशनी शिंदे यांच्या कार्यालयात घुसलेल्या जमावातील लोक व तेथे झालेला वाद माध्यमांनी प्रसारित केलेल्या चित्रफितींमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबत आयोग असमाधानी आहे, असे त्यांनी नमूद केले. ठाणे पोलिस आयुक्तांनी याप्रकरणी मंगळवारी महिला आयोगाच्या अध्यक्षांच्या कार्यालयात दुपारी १२.३० वाजता स्वतः उपस्थित राहून अहवाल सादर करावा, अशी सूचना त्यांनी केली आहे.

## पोलिस संरक्षण देण्याची मागणी

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

'समाजमाध्यमांवरील पोस्ट आणि प्रतिक्रियेवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवती सेनेच्या पदाधिकारी रोशनी शिंदे यांना शिवसेनेच्या (शिंदे गट) महिला कार्यकर्त्यांनी बेदम मारहाण केल्याचा आरोप असला, तरी या मारहाणीप्रकरणी कासारवडवली पोलिस ठाण्यात दोन अनोळखी महिलांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाची पोलिसांकडून चौकशी करण्यात येत आहे. ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ठाण्यातील नेत्यांपासून रोशनी यांना धोका आहे. रोशनी यांना पोलिस संरक्षण द्यावे,' अशी मागणी शिवसेनेच्या ठाणे जिल्हा महिला आघाडीच्या प्रमुख, ठाण्याच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी पोलिस आयुक्तांकडे केली. त्यांनी याबाबत पोलिसांना पत्रही दिले आहे.

### दोन अनोळखी महिलांवर अदखलपात्र गुन्हा



'रोशनी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण झाली. त्यांच्या जिवाला धोका असल्याचा खोटा आरोप केला जात आहे. पोलिसांवर चुकीचे आरोप करण्यात आले,' असे त्यांनी पत्रात नमूद केले. 'ठाण्यातील खासगी रुग्णालयातून रोशनी यांना सोडल्यानंतर राजकीय मंडळींनी त्यांना मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल केल्याचे समजले. या सर्व प्रकारावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, खासदार राजन विचारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड राजकारणासाठी सहानुभूती घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्यापासून रोशनी यांच्या जिवाला धोका आहे,' असा आरोपही मीनाक्षी शिंदे यांनी केला. 'रोशनी शिंदे यांना धोका कोणापासून आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे,' असे ट्वीट जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे. 'गुंडाना संरक्षण दिले असून ५०० पोलिस शिंदे गटाला संरक्षण देण्यासाठी आहेत,' असे या ट्वीटमध्ये नमूद आहे. तर, 'लोकांना खरे काय आणि खोटे काय, हे माहिती आहे. रोशनी यांना शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्यांनी मारहाण केली आहे, अशी प्रतिक्रीया शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी दिली.